# <u>प्रतिज्ञापत्र</u>

**<u>सूचना:</u> उमेदवाराने खालील प्रतिज्ञापत्रात नमूद नियम काळजीपूर्वक वाचून मगच त्यावर स्वाक्षरी करावी.**

**स्वाक्षरी केलेल्या प्रतिज्ञापत्राचा नमुना ऑनलाईन अर्ज भरताना स्कॅन करून अपलोड करावा.**

१. प्रशिक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांपैकी पात्र उमेदवारांची निवड मुलाखत, कल चाचणी, परीक्षा इत्यादीच्या आधारावर केली जाईल. सदर निवड प्रक्रिया पूर्णपणे महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमेन कॉर्पोरेशन लिमिटेड (मेस्को ),पुणे मार्फत राबविली जाणार आहे.

२. संपूर्ण प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींची **100%** उपस्थिती आवश्यक आहे.

३. प्रशिक्षण संस्थेमार्फत वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या परीक्षा, चाचण्या, इत्यादीना प्रशिक्षणार्थींनी पूर्ण तयारीनिशी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

४. प्रशिक्षण संस्थेने घालून दिलेल्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यास प्रत्येक प्रशिक्षणार्थी बांधील असेल, तसे न केल्यास प्रशिक्षणार्थींचे नाव प्रशिक्षणातून कमी करण्याचा अधिकार प्रशिक्षण संस्थेला असेल व प्रशिक्षणा-दरम्यान झालेला खर्च प्रशिक्षणार्थीकडून वसूल करण्यात येईल.

५. प्रशिक्षण संस्थेमार्फत वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या परीक्षा, चाचण्या इत्यादींना पूर्ण तयारीनिशी उपस्थिती, प्रशिक्षणादरम्यान वर उल्लेखलेल्या

प्रमाणे **100%** उपस्थिती, प्रशिक्षण संस्थेचे नियम व शिस्तीचे पालन व अटी पूर्ण करणारे प्रशिक्षणार्थीच प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असतील.

६. प्रशिक्षणाला प्रवेश घेताना प्रशिक्षणार्थीस त्याची मूळ कागदपत्रे व **2** छायांकित प्रती महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमेन कॉर्पोरेशन लिमिटेड (मेस्को), पुणे कडे जमा कराव्या लागतील व प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळेपर्यंत कागदपत्र महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमेन कॉर्पोरेशन लिमिटेड (मेस्को), पुणे कडे राहतील.

७. प्रशिक्षणार्थींना एका वेळी सारथी मार्फ़त राबविण्यात येणाऱ्या एकाच कौशल्य विकास कार्यक्रमात एकदाच सहभागी होता येईल.

८.याव्यतिरिक्त प्रशिक्षणासाठी निवड झाल्यानंतर सारथी आणि महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमेन कॉर्पोरेशन लिमिटेड (मेस्को), पुणे यांनी ठरविलेल्या इतर अटी व नियम यांचे पालन करणे आवश्यक राहील.

उमेदवाराची स्वाक्षरी